

# ॥ श्रीलक्ष्मीनृसिंह प्रसंन्ना ॥

## वसंतपुजा संग्रह

## भजने आरती, मंत्रपुष्पांजली व अष्टके


देव परिवार
ब्राम्हण गल्ली
मु.पो.टेंभूर्णी
ता.जाफ्राबाद, जि. जालना ४३१२०८
फोन नं . ०२४८५ – २२६४४०.
भ्रमन ध्वनी ः ९०९६२९२८५७, ९९७०३५९३३०
ईमेल ः deo.sagar@rediffmail.com



# ॥ भजनं प्रारंभ ॥




अलंकापुरी पुण्यभुमी पवित्र ।
तेथे नांदतो ज्ञान राजा सुपात्र ।
तया आठविता महा पुण्यराशी ।
नमस्कार साष्टांग ज्ञानेश्वराशी ॥

**गजर**

जय गोविंद जय हरी गोविंद जय गोविंद ॥
जय गोविंद जय हरी गोविंद जय गोविंद ॥
जय गोविंद जय हरी गोविंद जय गोविंद ॥

**॥ नरहरी शामराज महाराज की जय ॥**



# ॥ पंचपदि भजन ॥



(१)

## ॥ गणरायला जाऊनी सांगा ॥

गणरायला जाऊनी सांगा
माझी विनंती मयुर पुरी ॥

आग्रपूजेची आवड मोठी
शमीदुर अंकूर वाहयाला जाऊनी सांगा
माझी विनंती मयुर पुरी ॥१॥

भाद्रपदेसी शुध्द चतुर्थी
दंड कमंडल न्यायाला, जाऊनी सागां
माझी विनंती मयुर पुरी ॥२॥

चिंतामणीसुत अंकीत विनवि हो
येत असे नीजपद पायाला, जाऊनी सांगा,
माझी विनंती मयुर पुरी ॥३॥



## (२)
## ॥सुदंर ते ध्यान ॥



सुंदर ते ध्यान उभे विटेवरी
कर कटावरी ठेवूनीया ॥१॥

तुळसीहार गळा कासे पितांबर
आवडे निरंतर हेची ध्यान ॥

मकर कुंडले तळपती श्रवनी
कंठी कौस्तुभमणी विराजित ॥२॥

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख
पाहीन श्रीमुख आवडीने ॥३॥



## (३)
## ॥आता मी नाही॥



आता, मी नाही मी नाही
नरहरी वाचुन काही आता
मी नाही , मी नाही ॥

विकल्प अवघा सरला
विकल्प अवघा सरला
दोन्ही डोळा नरहरी भरला
आता मी नाही मी नाही ॥१॥

तद्धुम तद्धुम सारा
तद्धुम तद्धुम सारा
नरहरी वाचुन व्यर्थ पसारा
आता मी नाही मी नाही ॥२॥



## (४)
## ॥ लई नाही बुआ लई नाही ॥



लई नाही बूआ लई नाही
पोटा पूरते देही मागणे
लई नाही बूआ लई नाही ॥

कळणा अथवा कोंडा
देवा देई भुकेच्या तोंडा
मागणे लई नाही बुआ लई नाही ॥१॥

नव अथवा जुन वस्त्र
देवा देइ अंग भरुन
मगणे लई नाही बुआ लई नाही ॥२॥

साजुक अथवा शिळी
देवा देई भुकेच्या वेळी
मागणे लई नाही बुआ लई नाही ॥३॥

तुका म्हणे आता, तुका म्हणे आता,
नका पाहु पाया परता
मागणे, लई नाही बुआ लई नाही ॥४॥





(५)

## ॥ बोला गडीयांनो ॥

बोला गडीयांनो,
बोला गडीयांनो,
ऐसे काही बोला गडीयांनो ॥

एकबोल बोलावा वाकडा
जनु काही चिखली रूतला खडा
जयांचे शब्द होय निवाडा
ऐसे काही बोला गडीयानो ॥१॥

एक बोले पाण्याहुन पातळ
एक बोले चंद्राहुन शितळ
एक बोले समुद्रावरूनी खोल
ऐसे काही बोला गडीयांनो ॥२॥

हा बोल मुक्ताबाईने केला
चागंया शरण तयासी आला
चुकवी लक्ष चौऱ्यांशीचा फेरा
ऐसे काही बोला गडीयांनो ॥३॥



## (६)
## ॥ समझ मन ॥



समझ मन, गुरू गुरू, गुरू गुरू जपना
अरे रामा, और हये सब सपना
रे मनावा, गुरू गुरू गुरु गुरु जपना ॥धृ॥

माता पिता सहोदर कांता
ओभी नही कोई अपना
ओभी नही कोई अपना, रे मनवा गुरू गुरू, गुरू गुरू जपना
॥१॥

संचित बिन कच्छू प्राप्त नही है,
कायको भटकत फिरणा
कायको भटकत फिरणा, रे मनवा गुरू गुरू, गुरू गुरु जपना
॥२॥

कहत कबीरा ,सुन भई साधू
गुरू चरण मे रहना,
गुरू चरण मे रहना, रे मनवा, गुरू गुरू, गुरू गुरू जपना ॥३॥



# (७)
# ॥ आवडीने भावे हरीनाम घेसी ॥



आवडीने भावे हरी नाम घेसी
तुझी चिंता तयासी सर्व आहे ॥१॥

नको खेद करू कोणत्या गोष्टीचा
पती लक्ष्मींचा जाणतसे ॥२॥

सकळ जीवांचा करितो सांभाळ
तुज मोकलीन ऐसे नाही ॥३॥

जैसी स्थिति आहे तैशापरी राहे
कौतुक तु पाहे संचिताचे ॥४॥

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा
हरिकृपे त्याचा नाश झाला ॥५॥



## (८)
## ॥ रूप पाहता लोचनी ॥



रूप पाहता लोचनी
सुख झाले हो साजणी ॥१॥

तो हा विठ्ठल बरवा
तो हा माधव बरवा ॥१॥

बहुता सुकृताची जोडी
म्हणुनि विठ्ठल आवडी ॥२॥

सर्व सुखाचें आगर
बाप रखुमादेवीवर ॥३॥



## (९)
## ॥ भाव धरारे ॥



भाव धरारे, आपुलासा देव करारे
कोणी काही म्हणोयासाठी ।
बळकट प्रेम असावे गाठी ॥
निंदा स्तुतीवर लावुनी काटी ।
मी तु पण हरारे ॥१॥

सकाम साधन सर्व ही सांडा ॥
नीष्कामे मुळ भजीनी भांडा ॥
नाना कुतर्क वृत्तीसी दवडा ।
आलीया जरा रे ॥२॥

दुर्लभ नर देहाची प्राप्ती
हा नर देह न मीळे कल्पांती
ऐंसा विवेक जाणुनी चिंती
गुरू सी वरारे ॥३॥

केशरीनाथ गुरूंचें पायी ।
सृष्टी अवघी बुडाली ठाही ॥
शिव दिनी निश्चय दुसरा नाही ।
भक्त सखा रे ॥४॥



## (१०)
## ॥ सद्‌गुरू यावे ॥




सद्‌गुरू यावे,
मम भजनी सादर व्हावे ॥धृ॥
तव आगमने विघ्ने पळती ।
कामा धीक रिपू नष्टची होती ॥
आशा तृष्णा मनीबहु झुरती ।
कोठे जावे ॥१॥

भवविपीनीचा मार्ग भयंकर ।
क्षुर घोर परी म्हणती कवीवर ॥
सदगुरू येऊनी धरीतील जरीकर ।
अमरची व्हावे ॥२॥

किती रे माझा अंत पाहसी ।
मज दीनासी काय मागसी ॥
विश्वाचा तु पालक असती ।
मनी समजावे ॥३॥

माझा धावा हा परीसोनी ।
दंडकंमडलु करी घेऊनी ॥
तैसीच आले हो धावुनी ।
आसन दयावे ॥४॥

व्यासपिठावर सदगुरू बसले ।
भजनी प्रेमाचे पुर आले ॥
गिता मागुन गित रंगले ।
सात्वीक भावे ॥५॥



(११)
## ॥ ज्याचे सुख त्याला ॥



ज्याचे सुख त्याला, सुख त्याला, काय असे भलत्याला ॥धृ ॥

एक नदी तरूणी गेला
एक हकामारी तारूला ॥१॥

एक जेवुनी तृप्त झाला ।
एक हकामारी अन्नाला ॥२॥

तुका वैकुंठासी गेला ।
हकामारी तो लोकाला ॥३॥

(१२)
## ॥ हरीसे कोई नही रे बडा ॥

हरीसे कोइ नइ बडा दिवाने, क्यों गफलत मे पडा ॥धृ॥

हनुमान ने सेवा करके ।
ले दिर ना दिर उडा ॥१॥

प्रल्हाद बेटा हरिसे लिपटा ।
जभी खंब खडखडा ॥२॥

गोपीचंदन ने बचान सुनकर
माल मुलख सब छोडा ॥३॥



(१३)
## ॥ दासांचा जो दास ॥



दासांचा जो दास श्रीहरी |
दासांचा जो दास श्रीहरी |
नंदाचा नंदन |
घासितो नाथा घरी चंदन ॥धृ ॥

कावडी वर कावडी ओतील्या |
आणुनिया तातडी | ओतील्या आणुनिया तातडी |
हरीला भक्तिंचे बंधन | हरीला भक्तिंचे बंधन ॥१॥

नाथासह किर्तनी रंगे |
आपुल्या गुण गाईन | रंगे आपुल्या गुण गाईन |
साथ देइ चिपुल्यांची घोळुन | साथ देइ चिपुल्यांची घोळुन ॥२॥

भक्ताघरी राबतो सहज तो |
भक्तांना लाभतो | सहज तो भक्तांना लाभता
हरीला भक्तिचे बंधन | प्रभुला भक्तिचे बंधन ॥३॥



## (१३)
## कोण दिवस येइल कैसा




कोण दिवस येइल कसा, कोण जाणतो ||धृ||
एक दिवस हत्ती वरी |
मिरवीती या नवव्यापरी |
एक दिवस मिठ भाकरी |
दारी मागतो ||१||

एक दिवस वरच जरी |
किडाताती महांलातरी ||
एक दिवस चिंधी धरी |
नाही सांगतो ||२||

एक दिवस मान जनी |
चौरी फिरतील तनी ||
एक दिवस न पुसे कोणी |
सोडी प्राण तों ||३||

ऐसा हा विधी लिखीत |
जिवांना भासदेत ||
तुकड्याची मात नव्हे |
शास्रच बोधीतो ||४||





## (१४)
## ॥ आलो रायाचा जोशी ॥

आलो रायाचा जोशी होरा
ऐका हो ऐका हो ॥धृ ॥

मनाजी पाटील देह गाविचा ।
विश्वास नका धरू हो त्याचा ॥
घात करील हा नेयमाचा ।
पाडिल फशी ,पाडिल फशी ॥१॥

वासना बायको शेजारीन ।
झगडा कुटिल मुठी दारून
इच्या संगे नागावन
घर बुडविसी घर बुडविसी ॥२॥

एक जनार्दनाचा जोशी ।
होरा सांगतो लोकांशी ।
जा शरण सद्गुरू पाशी ।
फेरा चुकवा चौऱ्यांशीचा ॥३॥





(१५)
## || गुरू दत्त दिगंबंर ||

गुरू दत्त दिगंबर , भजोरे दिगंबर, भजोरे
त्रयमुर्ती आत्री तनया रे ||धृ||

पायी खडावा कटी मेखला
दंड कमंडलु माला |
शंख शुल शटकरी धरी जो |
चक्र विमल कमलाला ||१||

नाम सुधा तव मोचन करितो
अखिल मुमुक्ष जन वृंदा ||
श्रीपादा श्री वल्लभ नरहरी |
सदगुरू चरणी वृंदा या ||२||





(१६)

## ॥ सुखासाठी करिसी तळमळ ॥

सुखासाठी करिसी तळमळ ॥
पंढरीसी जा तु या एक वेळ
मग तु अवघासी सुखरूप होसी
जन्मोजन्मीचे दु:ख विसरसी ॥धृ ॥

चंद्रभागे करिता एक स्नान
महादोष पळती रानो रान
मग तु अवघासी सुखरूप होसी ॥१॥

लोटांगण घालीता महाव्दारी
कान धरुनी नाचती गरूडापरी
मग तु अवघासी सुखरूप होसी ॥२॥

नामा म्हणे उपमा तया दयावी
माझ्या विठ्ठलाची आलबल घ्यावी
मग तु अवघासी सुखरूप होसी ॥३॥





## (१७)
## ॥ शरदाचे चांदने ॥

शरदाचे चांदणे , मधुवनी , फुलला निशिगंध
|
नाचतो गोपीजन वृंद |
वाजवी पावा गोविंद ॥ धृ ॥

वारा झुळझळ तो |
फुलांचा सुगंध दरवळतो ॥
सांडला भरूनी आनंद |
वाजवि पावा गोविंद ॥१॥

धरूनीया हरीभक्ती |
गोजिरया गोपी गुणगुणती |
नाचतो गोपीजन वृंद |
वाजवी पावा गोविंद ॥२॥




## (१८)
## ॥ कानडा राजा पंढरिचा ॥

कानडा राज पंढरिचा ।
वेदांनाही नाही कळला ॥
अंत पार याचा ॥धृ॥

निराकार जो निरगुन ईश्वर ।
जसा प्रगटला तसा विटेवर ॥
उभय ठेविले हात कटीवर ।
पुतळा चैतन्याचा ॥१॥

जो नाम्याची खिर चाखतो ।
चोखोबांची गुरे राखतो ॥
पुरंदराचा हा परमात्मा ।
वाली दामाजिचा ॥२॥





(१९)

## ॥ तिन शिरे सहा हात ॥

तिन शिरे सहा हात ।
तया माझा दंडवत ॥

काखी झोळी पुढे श्वान ।
नित्य जान्हविची स्थान ॥

माथा जोभे जटाभार ।
अंगि विभुती सदंर ॥

शंख चक्र गधा हाती ।
पायी खडावा गर्जसी ॥

तुका म्हणे दिगंबर ।
तया माझा नमस्कार ॥



# ॥ उत्तर अभंग ॥



दत्त दत्त म्हणता वाणी । होय पातकाची हानी ॥
दत्त नामाचा सोहळा । धाक पडे कळी काळा ॥
दत्त नामाचा निजछंद । नामे प्रगटे ब्रम्हानंद ॥ ।
एका जर्नादनी दत्त । सर्व ठायी सदोदीत ॥
आम्ही दीना हुनी दीन । मज तुझा अभीमान ॥
देवा आलो शरणागत । माझे करावे त्वा हीत ॥
दिना नाथा कृपाळू बा । सांभाळावे आपुल्या बाळा ॥
नामा म्हणे केशवराया । आलो शरण तुझीया पाया ॥
आज करोनी आरती । चक्र पाण ओवाळती ॥
पुरले नवस । धन्य काळ हा दिवस ॥
पहा पहा हो सकळा । तुम्ही पुण्यवंत बाळा ॥
तुका वजवी टाळी । उभा सदोदित जवळी ॥
हे बोले चाले हरी । ज्याची कथा तोची करी ॥
तोची होऊनी श्रोताभक्ता । आपुले आपण करी कथा ॥
बोले रामा वल्लभ दासा । अवघ्या हरीच्या उल्हासा ॥
टाळ विणा घेऊनी हाती । केशवराज गाऊ किती ॥
आम्ही देवाचे देवाचे । दास पंढरीरायाचे ॥

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा ।
माझिया सकला हरीच्या दासा ॥

कल्पनेची बाधा न हो कुणी काळी
ही संत मंडळी सुखी असो ॥

अहकांराचा वारा न लागो राजसा ।
माझ्या विष्णुदासा भावीकासी ॥





शरिर प्राणाची करूनी कुरवंडी ।
क्षण एक सांडिण संधसाचा ॥

नामा म्हणे तया असावे कल्याण ।
घ्या मुखी हरी नाम पांडुरंग ॥

बोला विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ॥

## ॥ पुंडलीका वरदे हारी विठ्ठल ॥
## ॥ श्री ज्ञानदेव तुकाराम ॥

## ॥ पंढरीनाथ महाराज की जय ॥

## ॥ नरहरी शामराज महाराज की जय ॥



# ॥ सांय:पार्थना ॥



अविनयमपनय विष्णो
दमय मन:शमय विषय मृग तृष्णाम ।
भूतदयां विस्तारय
तारय संसार सागरत: ॥१॥

दिव्यधुनी मकरन्दे
परमिल परिभोग सच्चिदानन्दे ।
श्रीपती पदारविन्दे
भवभय खेदाच्छिदे वन्दे ॥२॥

सत्यपि भेदापगमे
नाथ तवांह न मामकीन । सत्वम ।
सामुद्रो हि तरङ्ग:
स्वचन समुद्रो न तरङ्ग: ॥३॥

उध्दृतनग नगभिदनुज
दनुज कुलामित्र मित्र शशी दृष्टे
द्रष्टे भवति प्रभवति
न भवती कीं भवतिरस्कार: ॥४॥

मत्स्यादि भिरवतारै
रवता रवता ऽ वसुधाम् ।
परमेश्र्वर परिपाल्यो
भवता भवता पभी तोहम् ॥५॥



दामोदर गुणमंदिर
सुंदर वदनारविन्द गोविन्द ।
भवजल धिमथन मंदर
परंम दरमपनय हां मे ॥६॥



नारायण करूणामय शरणं
करवाणि ताव कौ चरणो
इति षट्पदी मदीये
वदन सरोजे सदा वसतु ॥७॥

******



# ॥ आरती पंचायतनाची ॥




आदिस्मरणा गजवदना | लंबोदर सगुणा
मुषक वहना वरदा निज गहनी गहणा ॥
गंडस्थल मधुस्त्रवती मधुकर करी भ्रमणा |
सुरळा शुंडा मंडीत दशभुज पंचायतना ॥
जय देव जय देव जय पंचायतना |
गणेश अंबा रवि शिव जग पालक कृष्णा ॥१॥

सगुना निर्गुण बाला अगणित गुणनामा |
युक्ता युक्ती कैसी भागवत शिव धामा |
स्मरता स्मरता जग प्रगटे सिमा |
ब्रम्हानंदे वरदा पार्वती शिव धामा ॥
जय देव जय देव जय पंचायतना |
गणेश अंबा रवि शिव जग पालक कृष्णा ॥२॥

भास्कर हास्कर भानु रवि खग तम नाशा |
विश्व चक्षु दिनकर मित्रा गुन दिशा |
अर्काभानु मरिची जय सूर्या पुषां |
हिरण्य गर्भाने हा तोडी भव पाशा ॥
जय देव जय देव जय पंचायतना |
गणेश अंबा रवि शिव जग पालक कृष्णा ॥३॥

शांभव शंकर श्रीहरी शशी शेखर मौळी |
व्याघ्रांबर स्कंधावर अंकित निज भाळी |
त्रिशुळ मिरवीत हस्ते डमरू ध्वनी जाळी |
कर्पुर विराजित ध्याता हात कमळी ॥
जय देव जय देव जय पंचायतना |




गणेश अंबा रवि शिव जग पालक कृष्णा ||४||

अच्युत केशव माधव दामोदर नामा |
नारायण संकर्शण मुरलीधर शामा |
मुरहारक जगपालक अगणित गुणनामा |
गंगाधर लौकींकर स्तविते तव नामा ||
जय देव जय देव जय पंचायतना |
गणेश अंबा रवि शिव जग पालक कृष्णा ||५||



******





# ॥ आरती नृसिंहाची ॥



उत्कटीला प्रस्तंभ गडगडीले गगन ।
अगणित होता आहे कंपायमान ।
तटतटीले नक्षत्र पडता अविद्वान ।
उग्र रूपे प्रगटे तो नृसिंहवदन ॥
जय देव जय देव जय नरहरी, राया जय शामराया ।
जय जय करूणानिती, जय जय कृपानिती, भक्त कैवरीया ॥१॥

एकविस स्वर्गमाळा डळमळली कैसी ।
ब्रम्हयाच्या वाटे अभिनव चित्तासी ।
चंद्र सूर्य दोनी लोपती प्रकाशी ।
कैलासी शिवशंकर दचके मानसी ॥
जय देव जय देव जय नरहरी, राया जय शामराया ।
जय जय करूणानिती, जय जय कृपानिती, भक्त कैवरीया ॥२॥

थरथरती त्या जटा जिंव्हा लळलळितो ।
तीक्ष्ण नखांनी तो दैत्त्य विदारीतो ।
अर्धांगी कमलजा शिरि छाया धरितो ।
माधव दासा स्वामी नरहरी शोभतो ॥
जय देव जय देव जय नरहरी, राया जय शामराया ।
जय जय करूणानिती, जय जय कृपानिती, भक्त कैवरीया ॥३॥

******



# ॥ आरती नृसिंहाची ॥



जय देवा नरहारी, तू बापा कैवारी,
चिंतील्या पावशिल,भव भय निवारी, जय देवा नरहारी ॥धृ.॥

प्रल्हाद भक्त तुझा | दैत्यवंशी जन्मला |
यास्तव मोठीयाने | सिंहनाद थोर केला ॥
जय देवा नरहारी, तू बापा कैवारी,
चिंतील्या पावशिल,भव भय निवारी, जय देवा नरहारी ॥१॥

सिंहनाद थोर केला | चंद्र सूर्य लोपला |
ब्रम्ह हे वाक्य बोल | महाप्रलय मांडीला |
इंद्र हा थरारीला | इंद्रपदी कापला ॥
जय देवा नरहारी, तू बापा कैवारी,
चिंतील्या पावशिल,भव भय निवारी, जय देवा नरहारी ॥२॥

विक्राळ मुख बहु | जिंव्हा बाहेर लालोळे |
तिखट व्याघ्र नखे | महा दंत विशाल |
नेत्र हे ताम्रवर्ण | दोन्ही मिशा विशाल |
देखोनी राक्षसाशी | हृदय अंतर पोळे ॥
जय देवा नरहारी, तू बापा कैवारी,
चिंतील्या पावशिल,भव भय निवारी, जय देवा नरहारी ॥३॥

राक्षस मांडीवरी | आडवा घेवूनी या करी |
पोट त्वा चिरियेले | नखावरी विषधारी |
वेळ त्वा साधीयेली | कैसा मारीला वैरी |
प्रल्हाद भक्त तुझा | लोळे चरणावरी ॥
जय देवा नरहारी, तू बापा कैवारी,



चिंतील्या पावशिल,भव भय निवारी, जय देवा नरहारी ॥४॥



कैलास शिखरीचा । शिव भय पावला ।
म्हाणोनी लक्ष्मीसी । सवे घेवुनिया आला ।
आरंभ भक्त तुझा । देव स्वस्थळासी गेला ।
क्रोध हा शांतविला । विप्र गोविंद वर्णीला ॥

जय देवा नरहारी, तू बापा कैवारी,
चिंतील्या पावशिल,भव भय निवारी, जय देवा नरहारी ॥५॥

******



# ॥ आरती भूदेवाची ॥



निगमागम विस्तारक तारक आहेसी ।
केवळ तु अधीकारी जप तप यज्ञासी ।
वसिष्ठ उत्तम गुरू नाना वर्णासी ।
सकळांचे व्दिज मंत्र आहे तुज पाशी ।
जय देव जय देव जय भू देवा,
ब्रम्हण तू मम् दैवत, करिसी जन सेवा, जय देव जय देव ॥१॥

श्री विष्णुने हृदयी धरले पद कमळा ।
म्हणुनीया वैकुंठी शोभा वसते विमला ।
प्रसाद अवघा स्वामी तुमच्या पद कमळा ।
आर्शीवचने हारती भव चिंता सकळा ।
जय देव जय देव जय भू देवा,
ब्रम्हण तू मम् दैवत, करिसी जन सेवा, जय देव जय देव॥२॥

व्दिज वदने अर्पिता पावे देवासी ।
पूजन केल्या हरती पापांच्या राशी ।
पदतिर्थाचा महिमा न कळे कोणासी ।
गोसाविनंदन ध्यातो स्वहितासी ।
जय देव जय देव जय भू देवा,
ब्रम्हण तू मम् दैवत, करिसी जन सेवा, जय देव जय देव॥३॥

******



# ॥ प्रार्थना ॥



घालील लोटांगण वंदीन चरण ।डोळयांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेम आलिंगने आनंदे पूजिन ।भावे ओवाळीन म्हणे नामा ॥१॥

त्वमेव माताच पिता त्वमेव ।त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विदया द्रविणं त्वमेव ।त्वमेव सर्वं मम देव देव ॥२॥

कायेन वाचा मनसेंद्रियेर्वा ।बुध्दयात्त्मना वा प्रकृतिस्वभावात् ।
करोमि यदयम् सकलं परस्मै ।नारायणयेती समर्पयामी ॥३॥

अच्युतं केशवं रामनरायणं ।कृष्णादामोदरं वासुदेवं हरि ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं ।जानकी नायकं रामचंद्र भजे ॥४॥

हरे राम हरे राम ।राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण ।कृष्ण कृष्ण हरे हरे ॥५॥

** ॥ समाप्त ॥ **



# ॥ श्री नृसिंह अष्टक ॥



रमा ब्रह्मा देव देवा, सनका द्या शुका द्या
नारसिंह प्रसादेना , सर्वे गृन्हतू वैष्णवा ॥

ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्ट दोहं ।
तीर्थास्पदं शिवविरिश्चनुतं शरण्यम् ॥
भृत्यार्तिहन्प्रणतपाल भवाब्धिपोतं ।
वन्दे महापुरूषं ते चरणारविन्दम ॥१॥

त्यक्त्वा सुदुस्त्यज सुरेप्सित राजलक्ष्मी ।
धर्मिष्ठ अर्यवचसा यदगादरण्ष्यम ॥
मायामृगं दयितयेप्सित मन्वधाव ।
वन्दे महापुरूषं ते चरणारविन्दम ॥२॥

माता नृसिंहच् , पिता नृसिंह ।
भ्राता नृसिंहच् , सखा नृसिंह ॥
विद्या नृसिंहच् , द्रविणं नृसिंह ।
स्वामी नृसिंहच् , सकलं नृसिंह ॥

इथो नृसिंह परतो नृसिंह ।
यतो यतो याहही ततो नृसिंह ॥
नृसिंह देवा परो न कश्चीत ।
तस्मात नृसिंह शरण्यंम प्रपद्ये ॥



# ॥ मंत्र पुष्पांजली ॥



ॐ नमो' महद्भ्यो नमो ऽ अर्भकेभ्यो नमो युवभ्यो नम ऽ
आशिनेभ्यः
यजाम देवान यदि शक्नवाम मा ज्या यस:शं समा वृक्षि देवाः
॥

ॐ ममत्तुन परिज्मा वसर्हा ममत्तु वातो ऽ अपां वृषण्वान् ।
शशीतमिंद्रा पर्वता युवंनस्तन्नो विश्वे वरिवस्यन्तु देवा ः ॥

ॐ कथा ते ऽ अग्ने शुचयंत ऽ आयोर ददाशुर्वाजे भिराशुषाणा
ः ।
उभयत्तोके तनये दधाना ऋतस्य सामन् रणयंन्त देवा ः॥

ॐ यज्ञेन यज्ञमंयजन्त देवास तानि धर्माणि प्रथमान्यासन ः ।
ते ह नाकं महिमान ः सचंत्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवा ः ॥

ॐ सहस्त्रशीर्षदेवं विश्वाक्षं विश्वक्षंभवं ॥
विशवंन्नारायणं देवंमक्षर परमंपदं ।
विशवतःपरमा ः विश्वन्नारायण ष्ण् हरिं ।
विशवमेवेदं पुरषस्य विंश्वमुपुजीवीती ऽऽ

पतिंविश्वस्याऽऽत्मेश्वर षू शिवमच्युतं
नारायणं महाज्ञेय विश्वात्मानं परायणम् ॥

नारायणपरो ज्योतिरात्मा नारायणः पर ः ऽऽ
नारायणं परब्रम्ह तत्त्वंन्नरायणः पर ः ऽऽ
नारायणं ः परो ध्याताध्यानं ः नारायणः पर ः ऽऽ





यश्चकिंचित ज्जगत सर्व दृश्यतेश्रुयते ऽपिवा |
अन्तर्बहिश्च्चत सर्व व्याप्य नारायणस्थिता ः ॥
आनंत भव्ययंक वि षू समुद्रेत विश्वशंभुवं |
पदय, कोष, प्रती काश षू हृदयांचाय यदोमुखं ः ॥

आधोनिष्टया वित्तस्यांते नाभ्यांमुपरि तिष्ठति |
ज्वालमाला कुंलभाती विश्वस्याऽऽयतनं महत ॥

संतत षू शिलाभिस्तु लंब त्त्या कोशिसन्निभं |
तस्यांते सुषिरं षू सुक्ष्यतस्मीं सर्व प्रतिष्टितं ॥

तस्यमध्ये महाअग्नीर विश्वाचिर्विश्वतो मुखा ः |
सोऽग्रभग्वि भजनतस्टी न्न्हार मजल्लकवी ः |
तर्यउर्ध्व मदस्या ये रस्मयस्त तस संतता ॥


संतापयती संदेह मापादल मस्तक ः |
तस्यमध्ये वन्ही शीखानीयोरूर्ध्वाव्यवस्थीतः ॥

नीलतो यद मध्यस्या यब्दुले खेवा भास्मरा
नेवा रशूक वर्तन हे पीता मा सत्त्यनुपमा ः ॥

तस्यात शिखाया मध्ये परमात्त्मा व्यवस्थित ः
सहब्रम्हाः सहशिवाः सहहरीसेष्ट्रः सोक्षर परमस्वराह् ॥

ॐ तत् ब्रम्हा ऽऽ ॐ वायु ऽऽ
ॐ तदात्त्मा ऽऽ ॐ तत् सत्त्यम् ऽऽ
ॐ तत् सर्वं ऽऽ ॐ तत् पुर्वोरनम् ऽऽ

अंतचरती भुतेशु शुध्ययाम विश्वमूर्तीषु



त्वंयज्ञस्त्वं त्वंषट्कारस्त्वं इंद्रस्त्वं रुद्रस्त्वं विष्णूस्त्वं
ब्रम्हस्त्वं प्रजापती ः ॥



संतता आपोज्योती रसोमृत ब्रम्हभुर्भवस्वरोम ॥
ॐ राजाधिराजाय प्रसहयसाहिने नमो वयं वै श्रवणाय कुर्मे हे।
सं मे कामान कामकामाय महयं कामेश्वरो वैंश्रवणो
ददातु ॥

कुबेराय वैश्रवणाय महाराजय नम ः
ॐ स्वस्ती साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठयं
राज्यं॥

महा ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽराज्यमधिपत्त्यमयं
समंत पर्या ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ यी अस्यात
सार्व भौम ः सार्वायुषा ऽ
आन्तारदा ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ परारधात
पृथिव्यैसमुद्रपर्यांता या ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽएकराकीति
तदष्येषःइलोको ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ भिगीतः
मरुतः परिवे ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ ष्टारहा
मरुत्तस्या ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ वसनगृहे
आविक्षितस्य कामप्रे ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ
विश्वे देवा ऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ सभासदशी ॥

******



# ॥ श्री नृसिंहाष्टक प्रारंभ ॥



निर्गुण जो ब्रम्ह निरे निराकार |
भक्तासाठी होय सगुण तो साकार ॥
शुष्कस्तंभे प्रगटे व्यापक बहुदेशी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥१॥

सिंव्ह मुखी जो नर तनु वंदे मुखी ज्वाला |
लळ लळ जिंव्हा लाळीत दंष्टा विक्राळा ॥
विशालनेत्री पिंगट लंबट जटा शिराशी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥२॥



रत्न जडित तो मुकुट कुंडल दय करणी |
करीपरी ध्याना पितांबर नाना भरणी ॥
तिखट नखी जो हृदय विदारीत आसुराशी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥३॥

गर्जन ज्याचे ऐकुनी नक्षत्रे तुटती |
सोडिती ठाया दिग़ज पर्वत फुटताती ॥
कापे पृथ्वी भिती जनत्रिभुवनवासी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥४॥

डचके ब्रम्हा शंकर हे अंत:करणी |
लोपती तेथे कोटयावधी तो शशिकरणी ॥
देव विमानी मूर्च्छित ज्याच्या रूपाशी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥५॥



दैत्यांतराच्या शोभती कंटीच्या माळा |
प्रेमासाठी होऊनी प्रल्हादा डोळा ॥
ओवाळुनि श्री भयभीत मुडरण वदनासी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥६॥



स्वभक्त वचने रूप भयंकर आवरीले |
निर्जन जनाचे स्थापूनी विश्व सुखी केले ॥
जय जय कारे वर्षती सुरवर सुमनासी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥७॥

त्रिभुवनी नाही ज्या सम देव चमत्कारी |
पावती भजने चिंतीत सुरवर नर नारी ॥
सर्व ही तिर्थी क्षेत्रे देव ही त्या पाशी |
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥८॥

करी जो भावे नृसिंह आष्टक हे पवन |
सकळ जयांचे होतील मनोरथ हे पुर्ण ॥
जवळ जयाच्या नरहरी होता कैवारी |
भक्त मुरारी नृसिंह अंती ज्या तारी ॥
आना ध्याना तो नरहरी बहु सुखराशी ॥९॥

******



# ॥ श्री रामाष्टक प्रारंभ ॥





ज्याच्या हाती कार्मुक शोभे कणकाचे |
माथा वंद्दे भाषण जो का जनकाचे ॥
मर्यादेने वागवी लोका निज वाचे |
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥१॥

ज्याच्या कानी कुंडल शोभा दिसता हे |
ज्याच्या कंठी मौक्तिक माळा रूळताहे ॥
ज्याच्या ध्यानी दुर्घट माया फटफाटे |
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥२॥

सीता सेवी पाय जयाचे तळ हाते |
भावे ज्याला सेवीती ब्रम्हादिक गाती ॥
वेदा ज्याच्या पार कळेना गतीर कंठी |
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥३॥

पादस्पर्शे पावन केली मुनी जाया ॥
ज्याच्या नामे शितल झाली शिवकाया ॥
त्याला ध्याता दुसह दु:खही न वाटे |
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥४॥

ज्याच्या रूपा पाहुनी लज्जा रतीनाथा |
ज्याच्या पायी मारूती ठेवी निज माथा ॥
भक्तालागी सत्वर जावूनी जो भेटे ॥
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥५॥



पाषाणचा श्वेत समुद्री परी जो की
ऐक्या वाने राक्षस बिंधी बहु जो की
वाल्हा कोळी पावन नामे उफराटे
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥६॥





इच्छामात्रे निर्मळ लोका ते पाळी
लोके जो की सर्व ही माया लयकाळी
या ब्रम्हांडी किर्ती जयाचे घनदाटे
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥७॥

बोले जो की श्रीराम ऐसे निजवाचे ।
पायी त्याच्या लागथी माथे आमराटे ॥
याच्या योगी दुर्घट विघ्नाचल लोटे ।
त्याला घ्याता अंतरी माझ्या सुखवाटे ॥८॥

या स्त्रोत्राची घालूनी माळा निजकंठी ।
वाचे नामे घेऊनी काळा प्रती कुंठी ॥
कारूण्याचा सिंधू असा जो शतमूर्ती ॥
त्या श्रशिमा कोकीळ गंगाधर चिंती ॥९॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्णा कृष्णा हरे हरे ।
गोविंद रामा जय हरी गोपाला रामा ।
यादवा रामा । जय हरी माधवा रामा ।
अच्युतंम केशवं । रावनारायणम ।
कृष्णदामोधरंम । वासुदेवं हरे ।
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं ।
जानकी नायकंम रामचंद्र भजे ॥

**॥ श्री नरहरी शामराज महाराज की जय ॥**